जळगाव दि. १५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा ३१ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार, दि.१७ फेब्रुवारी, २०२३ रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात संपन्न होत असून, या समारंभाची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या दीक्षांत समारंभासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री. भगत सिंह कोश्यारी हे अध्यक्षस्थानी (ऑनलाईन) राहणार आहेत. भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ. एस. चंद्रशेखर यांचे दीक्षांत भाषण होणार आहे.

एकुण ३७ हजार १६९ विद्यार्थी पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले असून या **दीक्षांत समारंभात नोंदणी केलेल्या २० हजार ८५९ स्नातकांना पदव्या बहाल** करण्यात येणार आहेत. यामध्ये, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे ११५०२ स्नातक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे ४०४३ स्नातक, मानव्य विज्ञान विद्याशाखेचे ४३२७ आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे ९८७  स्नातकांचा समावेश आहे. या शिवाय स्वायत्त असलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे ३८४, मुळजी जेठा महाविद्यालयाचे १६०७, प्रताप महाविद्यालयाचे १०००, जी.एच.रायसोनी इन्स्टीट्युट ऑफ बिझीनेस मॅनेजमेंटचे ४०९ अशा एकूण ३४०० विद्यार्थ्यांना देखील पदवी बहाल केली जाणार आहे. गुणवत्ता यादीतील १०७ विद्यार्थ्यांना या समारंभात सुवर्णपदक दिले जाणार आहे. या मध्ये ६९ विद्यार्थिनी व ३६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. तसेच २ सुवर्णपदके समान गुणांमुळे विभागून देण्यात आलेली आहेत. या समारंभात १६४ पीएच.डी. धारक विद्यार्थी देखील पदवी घेणार आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये विद्यापीठ विषयी असलेली आत्मियता लक्षात घेवून व विद्यापीठाचे ब्रँडीग व्हावे या हेतूने या वर्षी प्रथमच डिग्री सर्टीफिकेट सोबत **"माझं विद्यापीठ, माझं ज्ञानवैभव"** असा मजकूर असलेले स्टिकर स्नातकांना दिले जाणार आहे. ते स्टिकर विद्यार्थ्यांनी आपल्या घरात प्रथमदर्शनी भागात लावणे अपेक्षित आहे.

विद्यापीठात पीएच.डी. (संशोधन) करणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेशापासून ते पीएच.डी. जाहीर  झाल्या नंतर दिल्या जाणाऱ्या नोटीफिकेशन पर्यंतची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यास प्रारंभ झाला असून या ऑनलाईन सेवेचे उदघाटन दीक्षांत समारंभाच्या दिवशी मिरवणूकीच्या आधी सिनेट सभागृहात प्रमुख अतिथींच्या हस्ते होणार आहे.  तसेच विद्यापीठाने संशोधनाला अधिक चालना मिळावी यासाठी संशोधन सहाय्यता योजना सुरु

केली असून या योजनेसाठी समाजातील दानशूर व्यक्ती तसेच संस्थांना आर्थिक मदतीचे आवाहन केले आहे. या योजनेच्या पुस्तिकेचे प्रकाशन देखील याच वेळी केले जाणार आहे. या पत्रकार परिषदेला प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक दीपक दलाल तसेच उपकुलसचिव के.सी.पाटील तसेच फुलचंद अग्रवाल उपस्थित होते.

विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्रावर विद्याशाखेचे नाव तसेच स्नातकाच्या आईचे नाव आहे. प्रमाणपत्रावर क्यूआर कोड राहणार असून या कोडच्या सहाय्याने मोबाईल ॲप्लीकेशनद्वारे पदवी पडताळणी करता येईल. प्रमाणपत्रावरील विद्यापीठाच्या होलोग्राम मुळे प्रमाणपत्राची सुरक्षितता अधिक वाढली आहे. विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर स्नातकांसाठी डिग्री कोड देण्यात आला आहे. याशिवाय मोबाईल मॅसेजद्वारे देखील डिग्री कोड पाठविण्यात आला आहे. स्नातकांनी पदवी ग्रहण करण्यासाठी सभारंभाच्या दिवसी प्राप्त झालेली डिग्री कोड, ओळखदर्शक कागदपत्रांसह उपस्थित रहावे. स्नातकांना पदवी प्रमाणपत्र मिळणे सोयीचे व्हावे, याकरीता पदवी प्रमाणपत्राचे व उत्तरीय वाटप अभ्यासक्रमनिहाय खालील प्रमाणे प्रशासकीय इमारतीत काऊंटरवर देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. **दालन क्र.१०७ (सामान्य प्रशासन, आवक-जावक विभाग):- खिडकी क्र.०१** वर बी.ए.इंग्रजी आणि डी.पी.ए., बी.एफ.ए., बी.एस.डब्ल्यु, एम.एफ.ए., एम.ए.-वुमन स्टडीज, एम.एस. डब्ल्यु (मास कम्युनिकेशन),बी.ए. व एम.ए. म्युझिक, **खिडकी क्र.२** वर बी.ए.-मराठी, हिंदी, संस्कृत, उर्दू, जनरल आणि एम.ए.-इंग्रजी,मराठी,हिंदी, संस्कृत व उर्दू तसेच एम.ए.-इंग्रजी, मराठी व हिंदी (सीएलएल), **खिडकी क्र.३** वर बी.ए. व एम.ए.-इतिहास, भुगोल, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, संरक्षणशास्त्र, तत्वज्ञान, ड्रामाटिक्स, योगीकशास्त्र, आंबेडकर थॉटस्, **दालन क्र.११४ (प्रवेश व पात्रता विभाग) खिडकी क्र.०४** वर बी.एस्सी. केमेस्ट्री, **खिडकी क्र. क्र.०५** वर बी.एस्सी. कॉम्प्युटर, फिजिक्स,इलेक्ट्रानिक्स, मॅथेमॅटीक्स,स्टॅटेस्टिक्स, **खिडकी क्र.०६** बी.होक सर्व विषय , एम.एस्सी. सर्व विषय व एम.एस्सी./एम.ए.भुगोलसह **खिडकी क्र.७** वर बी.एस्सी. बॉटनी, झुलॉजी, जॉग्रफी, जिओलॉजी, बायोकेमेस्ट्री, इनफॉर्मेशन टेक्नॉलाजी, बायोटेक्नॉलॉजी, इन्व्हार्मेंट सायन्स, एक्च्युरिअल सायन्स, बी.सी.ए. (इन्टेग्रेटेड), **खिडकी क्र.८** वर बी.ई. (सर्व विषय), बी. आर्कीटेक्चर, **दालन क्र. १२९ (कार्यकारी अभियंता कार्यालय) खिडकी क्र.०९** विधी व वैद्यकीय आणि औषधनिर्माणशास्त्र, **खिडकी क्र.१०** शिक्षणशास्त्र विद्याशाखा, सर्व बी.टेक., एम.टेक व एम.ई. सर्व विषय, **दालन क्र.१११ (प्रवेश व पात्रता विभागा शेजारी) खिडकी क्र. ११** वर पीएच.डी. सर्व विषय, एम.फिल., **खिडकी क्र.१२** वर

बी.कॉम. **खिडकी क्र.१३** एम.कॉम, व्यवस्थापनशास्त्र सर्व विषय, **खिडकी क्र. १४ (चौकशी कक्ष)** वर दिव्यांगसाठी (सर्व अभ्यासक्रम), **खिडकी क्र. १५ वर** पदवी कोड शोधणे, सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांची नाव नोंदणी प्रशासकीय इमारत, बांधकाम विभाग, विद्यापीठ उपअभियंता **दालन क्र.**१२५ मध्ये करण्यात येणार आहे. याबाबतचा सर्व तपशील विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर देण्यात आला आहे. समारंभस्थळी सकाळी ठिक ८ वाजता विद्यार्थी व निमंत्रितांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. समारंभासाठी विद्यार्थ्यांसाठी पांढऱ्या रंगाचा शर्ट, पांढऱ्या रंगाची पँन्ट किंवा पांढऱ्या रंगाचा नेहरु शर्ट आणि पांढऱ्या रंगाचे चुस्त तर विद्यार्थिनीसाठी लाल किनार असलेली पांढरी साडी, लाल रंगाचे ब्लाऊज किंवा लाल रंगाचा कुर्ता (कमीज) व पांढऱ्या रंगाची सलवार असा पोशाख असावा.

तसेच सदर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण (live) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर होणार आहे. सदर कार्यक्रमाचे प्रक्षेपण विद्यार्थ्यांनाही बघता यावे यासाठी महाविद्यालयांनी व्यवस्था करावयाची आहे. या बाबत सर्व महाविद्यालयांना सूचना निर्गमीत केलेल्या आहेत.

---

जळगाव दिनांक १५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे प्रशाळेच्या राज्यशास्त्र विभागातील शैक्षणिक सहलीसाठी दिल्ली येथे संसद भवन येथे भेट देण्यासाठी रवाना झाले आहेत. सदर शैक्षणिक सहल सामाजिक शास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा डॉ अजय पाटील व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ उमेश गोगडीया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेली आहे. सदर विद्यार्थ्यांसोबत प्रा लोकेश तायडे, प्रा पौर्णिमा देशमुख, प्रा अक्षय सपकाळे, बाबासाहेब जाधव व कल्पेश चौधरी हे आहेत. सदर अभ्यास दौऱ्यात विद्यार्थी संसद भवन,राष्ट्पती भवन, अनुसूचित जनजाती आयोग, विद्यापीठ अनुदान आयोग, आय सी एस एस आर इ. ठिकाणी भेट देणार आहेत.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

आपल्या लोकप्रिय दैनिकात वरील बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी